# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ४११००४

## प्रकटन

**विषय –** मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या कल-अभिक्षमता चाचणी निकालाबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या परीक्षेत सुयश संपादन करण्यासाठी सर्व शाळा, पालक व विद्यार्थी अहोरात्र खडतर प्रयत्न करीत असतात. बहुतांश विद्यार्थी त्यात यशस्वीदेखील होतात. परंतू या मिळालेल्या यशानंतर पुढे नेमके काय करायचे हे केवळ इयत्ता १० वीत मिळालेल्या गुणांवर ठरविण्याकडे बहुतांश घटकांचा कल असतो. मात्र हे करीत असतांना विद्यार्थ्यांचा कल/आवड कोणत्या क्षेत्राकडे आहे ही बाब दुर्लक्षित रहात होती. सर्वच विद्यार्थ्यांचा कल/आवड जाणून घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करणे व त्याद्वारे विद्यार्थ्यांचा कल निश्चित करुन त्याबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ यांचेमार्फत प्रगल्भ दूरदृष्टी असलेल्या कलमापन चाचणी हा उपक्रम सुरु करण्याचे ठरले व त्यानुसार मार्च २०१६ च्या परीक्षेला प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांपासून हा उपक्रम सुरु करण्याचे निश्चित केले. कलमापन चाचणी हा उपक्रम महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण (विद्या प्राधिकरण) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला जात असून श्यामची आई फौंडेशन, पुणे हे CSR च्या साहाय्याने या उपक्रमाचा अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

सन २०१६ ते सन २०१८ च्या इ. १० वी च्या परीक्षेतील विद्यार्थ्यांचे कलमापन चाचणी पुढील सात क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे कल जाणून घेण्यासाठी घेण्यात आली.

(१) कृषी (२) कला/मानव्यविद्या (३) वाणिज्य (४)ललित कला (५) आरोग्य व जैविक विज्ञान (६) तांत्रिक (७) गणवेशधारी सेवा

अशा प्रकारची कलमापन चाचणी घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. पहिल्या तीन वर्षामध्ये सदर कलचाचणी संगणकाच्या माध्यमातून घेण्यात येत होती. परंतू दर्जेदार संगणकांची उपलब्ध संख्या आणि यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन चालू शैक्षणिक वर्षामध्ये म्हणजेच सन २०१८-१९ मध्ये कलमापन चाचणी मोबाईलच्या माध्यमातून घेण्याचे ठरविले. याकरिता प्रायोगिक तत्त्वावर सातारा जिल्हयामध्ये तेथील

दुर्गम, ग्रामीण आणि शहरी भागाचा विचार करुन ही चाचणी ऑफलाईनच्या माध्यमातून घेण्याची सोय उपलब्ध करुन दिली. यामध्ये ४२,१३५ विद्यार्थ्यांची चाचणी मोबाईल फोन वापरुन यशस्वीरित्या पूर्ण झाली.

या प्रायोगिक तत्वावर यशस्वीरित्या घेतलेल्या चाचणीच्या आधारे, मोबाईल तंत्रज्ञानाचा सुलभ वापर, कलचाचणीच्या कामकाजामधील सहजता आणि डेटा अपलोड होणे सुलभ व्हावे म्हणून संपूर्ण राज्यात ही चाचणी मोबाईच्या माध्यमातून घेतली गेली. तत्पूर्वी मोबाईलद्वारे ही चाचणी कशी घ्यावी याचे प्रशिक्षण राज्याच्या सर्व विभागीय मंडळामध्ये देण्यात आले. सदर प्रशिक्षणास प्रत्येक तालुक्यातून प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली गेली. अश शिक्षकांनी साखळी पद्धतीने आपापल्या तालुक्यातील सर्व शाळांमध्ये हे प्रशिक्षण दिले.

यावर्षी कलमापन चाचणीबरोबरच विद्यार्थ्यांच्या क्षमता जाणून घेण्यासाठी अभिक्षमता चाचणीसुद्धा घेतली गेली. विद्यार्थ्यांना त्यांचा कल कोणत्या क्षेत्रामध्ये आहे हे जाणून घ्यायला कलचाचणी मदत करते. त्याचबरोबर त्यांचा कल असलेल्या कल क्षेत्रात पुढील शिक्षणासाठी त्याचा क्षमता पुरेशा आहेत का? यासाठी अभिक्षमता चाचणी मदत करते. या अभिक्षमता चाचणीअंतर्गत (१) भाषिक (२) तार्किक (३) अवकाशीय (४) सांख्यिकीय अशा चार क्षमतांची चाचणी घेतली गेली.

कल-अभिक्षमता चाचणीचा अहवाल शनिवार **दिनांक १६ मार्च २०१९** रोजी www.mahacareermitra.in या पोर्टलवर दुपारी ११.०० वाजल्यापासून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना त्यांचा कल-अभिक्षमता चाचणीचा छापील अहवाल देखील **दिनांक २२/३/२०१९** पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना निकालापूर्वी साधारण अडीच महिने अगोदर पुढील करियर आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात एक सुयोग्य करियरचा पर्याय निवडण्यासाठी विचारमंथन सुरु करता येईल.

विद्यार्थी त्यांच्या एस. एस. सी परीक्षेच्या बैठक क्रमांकांच्या आधारे त्याचा कल-अभिक्षमता चाचणी अहवाल प्राप्त करु शकतात. त्यासाठी www.mahacareermitra.in या पोर्टलवर जाऊन मुख्य पृष्ठावर त्यांनी आपला हा क्रमांक नमूद केल्यानंतर त्यांना त्यांचा अहवाल मिळू शकेल. या अहवालामध्ये त्यांना कल आणि अभिक्षमताविषयी माहिती मिळू शकेल. हा अहवाल विद्यार्थी डाऊनलोड करु शकतात. यासोबत त्याचा कल असलेल्या क्षेत्राविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ ते पाहू शकतात. याशिवाय प्रत्येक क्षेत्रनिहाय माहितीपर व्हिडिओ आणि प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन करणारे व्हिडिओही या पोर्टलवर उपलब्ध आहेत. याचा लाभ विद्यार्थी घेऊ

शकतात. तसेच त्यांच्या आवडीच्या कल क्षेत्रानुसार त्यांच्या जिल्हयातील उपलब्ध अभ्यासक्रमांचा शोधही त्यांना या पोर्टलद्वारे घेता येऊ शकतो. पोर्टलवर ८० हजारांहून अधिक शासनमान्य अभ्यासक्रमाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याच पोर्टलवर जिल्हयातील DIECPD च्या VGPG कक्षांचे, जिल्हा समुपदेशकांचे, विभाग प्रमुखांचे दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी त्यावर संपर्क साधल्यास त्यांच्या अहवालानुसार त्यांना मार्गदर्शन उपलब्ध होईल.

महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना या व अशा अनेक उपक्रमांद्वारे त्यांच्या क्षमतेपर्यंत नेण्यासाठी सहाय्यभूत होण्याचा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्याचा दृष्टीकोन महाराष्ट्र शासनाचा आहे.

**कल – अभिक्षमता चाचणी २०१९ ची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे –**

१. राज्यातील २२,१२२ शाळांमधून इयत्ता १० वी च्या १६,१३,६०९ विद्यार्थ्यांची कल-अभिक्षमता चाचणी मोबाईलच्या माध्यमातून घेतली गेली.

२. ३६ % विद्यार्थ्यांनी ७ कल क्षेत्रापैकी 'ललित कला' आणि 'गणवेशधारी सेवा' या क्षेत्रांना पहिले प्राधान्य दिले.

३. २०.३३ % मुलींचा कल 'ललित कला' क्षेत्रात आणि १६.५७ % मुलींचा कल 'गणवेशधारी सेवा' या कल क्षेत्रामध्ये दर्शवितो.

४. १८.९२ % मुलांचा कल गणवेशधारी सेवा आणि १७.७३ % वाणिज्य क्षेत्रामध्ये दर्शवितो.

५. जवळपास १७ % विद्यार्थ्यांचे 'वाणिज्य' हे कल क्षेत्र दुसरे प्राधान्य दर्शविते.

६. जवळपास १७% विद्यार्थ्यांचे 'वाणिज्य' हे कल क्षेत्र दुसरे प्राधान्य दर्शविते.

७. जवळपास ३२% मुलींचे 'वाणिज्य' आणि तांत्रिक हे दुसरे प्राधान्य असलेली कलक्षेत्रे आहेत.

८. वाणिज्य (कॉमर्स) कलक्षेत्रामध्ये मुलांनी दुस-या क्रमांकाचे प्राधान्य दर्शविले आहे.

९. महाराष्ट्रामधील ९ विभागांपैकी ४ विभागांमध्ये 'गणवेशधारी सेवा' (Uniformed Services ) आणि ३ विभागांमध्ये 'ललित कला' (Fine Arts) हे कल क्षेत्र सगळयात जास्त प्राधान्य असलेले क्षेत्र आहे.

१०. महाराष्ट्रातील सर्व ९ विभागांमधील वाणिज्य (Commerce) या कल- क्षेत्राला सगळयात जास्त दुस-या क्रमांकाचे प्राधान्य दर्शविते.

राज्यातील मुलांचे आणि मुलीचे ७ कल क्षेत्रामधील पहिले प्राधान्य असलेले कल

| | कृषी | कला/ मानव्यविद्या | वाणिज्य | ललित कला | आरोग्य व जैविक विज्ञान | तांत्रिक | गणवेशधारी सेवा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुली | १४.७३% | १४.५३ % | १४.३९% | २०.३३% | ९.१७% | १०.२८% | १६.५७% |
| मुले | १३.५५% | १२.४५% | १७.७३% | १६.३२% | १३.०१% | ८.०२% | १८.९२% |
| महाराष्ट्र | १४.११% | १३.४१% | १६.१९% | १८.१७% | ११.२४% | ९.०६% | १७.८३% |

स्त्रोत : कल चाचणी २०१९ डेटा.

टिपण : या डेटामध्ये ३,८६,१२१ विद्यार्थ्यांनी एकापेक्षा जास्त कल क्षेत्रामध्ये प्रथम प्राधान्ये दर्शविली आहेत.

| विभाग | कल-अभिक्षमता चाचणी दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| पुणे | २,६७,६२७ |
| नागपूर | १,६१,९६५ |
| औरंगाबाद | १,८३,२५४ |
| मुंबई | ३,५१,८६६ |
| कोल्हापूर | १,३९,५२७ |
| अमरावती | १,६६,७६८ |
| नाशिक | २,००,५२० |
| लातूर | १,०७,४७२ |
| कोकण | ३४,६१० |
| महाराष्ट्र | १६,१३,६०९ |

दिनांक - १५/३/२०१९

(डॉ. अशोक भोसले)
सचिव. पत्र क्र. अविमं/मा.प./3443-
दि. १६/०३/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.१०वी )परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या कल-अभिक्षमता चाचणी निकालाबाबत.

संदर्भ :- १.जा.क्र.रा.मं./कलमापन चाचणी/१५९१, दिनांक १५/०३/२०१९

आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त पृष्ठांकित प्रकटनाची सर्व मान्यता प्राप्त शाळांनी नोंद घेवून कार्यवाही करावी.

विभागीय सचिव, करिता
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती.

प्रत माहितीस्तव:-
१. मा.सचिव, म.रा.माध्य.व उच्च माध्य.शि.मंडळ, पुणे-०४.
२. शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती.
३. शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.) जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम.

bulA4.